ठेकेदाराचे नाव ______________________

दि ____________

प्रभारी अधिकारी,
कृषि संशोधन केंद्र,
पालघर, जि. पालघर

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली
जि. रत्नागिरी

## " कृषि संशोधन केंद्र, पालघर येथील चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत देणे निविदा "

कोऱ्या निविदा पत्रिका मिळण्याची मुदत

दिनांक २५/१०/२०२१ ते १५/११/२०२१

१२.०० वाजेपर्यंत

निविदा पत्रिका स्विकारण्याचा अंतिम दिनांक

१५/११/२०२१ रोजी १३.००वाजेपर्यंत

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

## कृषि संशोधन केंद्र, पालघर– जि. पालघर

**चिकु बागेतील फळे काढण्यास**

**मे २०२२ पर्यंत विक्री निविदा**

प्रति,

**मा. प्रभारी अधिकारी,**
कृषि संशोधन केंद्र
पालघर, जि. पालघर

**विषय :– चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत देणे निविदा ....**

**संदर्भ :–**

महाशय,

आपल्या दिनांक ...................... चे जाहीरातीनुसार, मी आपल्या प्रक्षेत्रावरील **चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत** विक्रीसाठी घेऊ इच्छितो. आपल्या निविदा संबंधीच्या सर्व अटी/शर्ती मला मान्य आहेत. मी आपल्या प्रक्षेत्रावरील सन २०२१–२२ चे हंगामात आलेली **चिकु झाडे (२२५) मे २०२२ पर्यंत** रु. ....................; रु. ........................................ ............................. रक्कमेस घेण्यास तयार आहे.

आपला विश्वासू

..........................................

**संपूर्ण पत्ता :–.**

..........................................

..........................................

..........................................

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जि. रत्नागिरी

# कृषि संशोधन केंद्र, पालघर– जि. पालघर

फोन क्र. – ०२५२५ २४१०४८

## चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत विक्री निविदा

जा.क्र. डॉबासाकोकृवि/संशो–२/१९११/२०२१, दिनांक १६/०९/२०२१ नुसार डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या **कृषि संशोधन केंद्र, पालघर जि. पालघर** येथील सन (२०२१–२२) या वर्षातील हंगामासाठी **चिकु बाग (२२५ झाडे)** देणे करिता दि. २५/१०/२०२१ ते दि. १५/११/२०२१ या कालावधीमध्ये निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख दि १५/११/२०२१ रोजी दुपारी १३.०० वाजेपर्यंत असून निविदा दि. १६/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता निविदाधारकासमोर उघडण्यात येतील. निविदांचा निकाल त्याचवेळी देण्यात येईल. निविदा कृषि संशोधन केंद्र, पालघर ता. जि. पालघर येथे स्विकारण्यात येतील. निविदा संबंधीच्या अटी/शर्ती व निविदा फॉर्म केंद्राच्या कार्यालयात कार्यालयीन दिवशी सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० या वेळेत प्रत्येकी रू. ५०० – रोख रक्कम भरून मिळतील.

दिनांक 25/10/2021
ठिकाण : पालघर

(signature)
प्रभारी **अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
पालघर, जि. पालघर

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,
**कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि.पालघर,**

## चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत देणे बाबत अटी/शर्ती

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठांतर्गत कृषि संशोधन केंद्र, पालघर जि. पालघर येथील चालू हंगामातील (२०२१–२२) चिकु बाग (२२५ झाडे) मे २०२२ पर्यंत लिलाव पध्दतीने द्यावयाची आहे. त्यासाठी निविदा दि. १५/११/२०२१ दुपारी १३.०० वाजेपर्यंत मागविण्यात येत आहेत लिलावासंबंधीच्या अटी/शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| १. | या संशोधन केंद्राच्या प्रक्षेत्रावरील चिकु बागेतील फळे काढण्यास देणेसाठी एकत्रित रू. १०,०००/– इतकी अनामत रक्कम ठेवण्यात आली आहे. अनामत रक्कम धनाकर्षाने (डी. डी.) लखोटयातून स्विकारण्यात येईल. धनाकर्ष **डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ** यांचे नावे **पालघर शाखेवरील** देय असावा. |
| २. | निविदा लखोटा पध्दतीने (दोन लखोटा पध्दत) स्विकारण्यात येईल लखोटा क्र. १ मध्ये अनामत रक्कमेचा धनाकर्ष (डी. डी.) व जिल्हा बाजार समितीचा नोंदणी परवाना सादर करण्यात यावा अथवा त्याबाबतच्या जबाबदारीचे हमीपत्र व लखोटा क्र. २ मध्ये निविदा दराचा फॉर्म सादर करण्यात यावा. लखोटा क्र. १ मधील सर्व कागदपत्रांची पुर्तता झाल्यावरच लखोटा क्र. २ उघडण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. |
| ३. | मोहरबंद निविदांच्या पाकीटांवर **'सन २०२१–२२ मधील मे २०२२ पर्यंत चिकु बागेतील फळे काढण्यास देणे'** असे नमुद करावे आणि त्याखाली कार्यालयाचा पत्ता असावा व पाकिटाच्या मागील बाजूस निविदाधारकाचे संपूर्ण नांव व पत्ता असावा. |
| ४. | निविदा भरलेल्या रक्कमे व्यतिरिक्त इतर कर असल्यास ते संबंधित निविदाधारकास भरावे लागतील. निविदा रक्कमेशी त्याचा संबंध राहणार नाही. |
| ५. | निविदा उघडल्यानंतर सर्वात जास्त दराने देकार सादर करणाऱ्या प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या निविदाधारकांची अनामत रक्कम राखून ठेवण्यात येईल. उर्वरित अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर होईल त्यांनी लिलावात मंजूर झालेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम भरल्यानंतर उर्वरीत ठेकेदारांची रक्कम परत करण्यात येईल. |
| ६. | मंजूर निविदाधारकाने लिलाव नाकारल्यास त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. |
| ७. | ज्याची निविदा स्विकारली जाईल, त्यांना रु. १००/– किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करार करावा लागेल. स्टॅम्प पेपरचा खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे. |
| ८. | स्वीकृत निविदेत नमूद केलेल्या रक्कमेच्या ५० टक्के रक्कम २४ तासांच्या आत रोखीने कार्यालयात भरणा करावी लागेल. उरलेली ५० टक्के रक्कम ४ दिवसांच्या आत कार्यालयात रोखीने भरावी लागेल. |
| ९. | स्वीकृत निविदाधारकाने चिकु बागेची सर्व निगा, फवारण्या इत्यादि करून फळे घ्यावयाची आहेत. बागेची निगा करताना व फळे तोडताना झाडाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास संबंधित निविदाधारकास जबाबदार धरले जाईल आणि होणारे नुकसान भरुन द्यावे लागेल. |
| १०. | निविदा पाठवितांना निविदाधारकाने घातलेली कोणतीही अट स्विकारली जाणार नाही व त्यास निविदा प्रक्रियेतून रद्द ठरविण्यात येईल. |
| ११. | निविदा मंजूर झाल्यापासून चिकु झाडांची सर्व निगा निविदाधारकाने करावयाची आहे. |
| १२. | लिलावासाठी असलेली चिकु झाडे कार्यालयीन वेळेत सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० पर्यंत प्रत्यक्ष पाहता येतील. |
| १३. | निविदा मंजूर झाल्यानंतर आग, वादळ, पाऊस आणि चोरी इत्यादी कारणांमुळे होणाऱ्या फळांच्या नुकसानीस विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. |
| १४. | निविदा रविवार व सुट्टीच्या दिवसाखेरीज सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० या वेळेत स्विकारण्यात येतील. |

| | |
|---|---|
| १५. | निविदा स्विकारण्याची **अंतिम मुदत दि. १५/११/२०२१ रोजी १२.०० वाजेपर्यंत** राहील आणि निविदा **दि. १६/११/२०२१ रोजी सकाळी ११.००** वाजता निविदाधारकांसमोर उघडण्यात येतील. विहीत वेळेनंतर आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाहीत. |
| १६. | निविदेमध्ये रक्कमेच्या आकडयात खाडाखोड, गिरविणे इत्यादी गोष्टी असल्यास त्यावर निविदाधारकाची संपूर्ण सही असणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा रद्द करण्यात येईल. |
| १७. | उपरोक्त चिकु बाग हि कमिटीने ठरविलेल्या किंमती पेक्षा कमी किमतीच्या निविदा आल्यास निविदा स्विकारण्याचा अगर नाकारण्याचा हक्क समितीकडे राहील. |
| १८. | कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा हक्क खालील सही करणाऱ्यांनी राखून ठेवला आहे. |
| १९. | मोहोरबंद निविदेव्दारे वाजवी किंमत न आल्यास निविदा उघडल्यानंतर लगेचच उपस्थित निविदाधारकांसमोर सदर बागेतील चिकु झाडांच्या मे २०२२ पर्यत विक्रीसाठी बोलीव्दारे लिलाव पध्दतीने विकण्याचा हक्क राखून ठेवला आहे. तोंडी बोलीव्दारे लिलावात फक्त ज्यांनी अनामत रक्कम भरुन निविदा भरल्या आहेत त्यांनाच भाग घेता येईल. |
| २० | चिकु फळे शनिवार, रविवार व शासकीसय सुटटीच्या दिवशी तोडता येणार नाहीत. |
| २१ | चिकु फळे तोडणीनंतर संबधीत प्रक्षेत्रावरील कृषी सहाय्यकांच्या समोर वजन करुन घ्यावयाचे आहेत. |

दिनांक :– पालघर

**प्रभारी अधिकारी**
कृषि संशोधन केंद्र
पालघर, जि. पालघर

## चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत विक्री निविदेबाबत करारनामा

मी खालील सही करणार श्री........................................................ लिहून देतो की चिकु बागेची मे २०२२ पर्यंत विक्रीसाठी निविदेतील खालील अटी व शर्ती मला मान्य आहेत

१ मी माझी निविदा नाकारल्यास माझी अनामत रक्कम जप्त केल्यास माझी कोणतीही तक्रार राहणार नाही

२ निविदा भरलेल्या रकमेच्या ५० टक्के इतकी रक्कम मी २४ तासांच्या आत रोखीने भरली आहे उर्वरित ५० टक्के रक्कम ८ दिवसांच्या आत मी कार्यालयात रोखीने भरीन

३ चिकु फळे तोडताना झाडांचे कोणत्याही प्रकारे नुकसान करणार नाही, जर नुकसान झाले तर नुकसान भरपाई करीन

४ चिकु फळांचे आग, वादळ आणि पाऊस अगर अन्य प्रकारे नुकसान झाल्यास मी जबाबदार राहीन

५ चिकु फळे विक्री निविदेत भरलेल्या रक्कमेव्यतिरिक्त इतर कर असल्यास ते मी भरण्यास तयार आहे.

६ चिकु बागेतील चिकु फळांची राखण मी करीन.

७ प्रक्षेत्रावर फळ वाहतुकीसाठीची वाहने सकाळी ७.०० ते संध्याकाळी ७.०० या कालावधीत आणण्यास परवानगी देण्यात येणार आहे.

**निविदा सुचना**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ

# कृषि संशोधन केंद्र, पालघर जि. पालघर

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर येथील चिकु बागेतील फळे (२२५ चिकु झाडे) विक्रीसाठी मे २०२२ पर्यंत देणेसाठी (सुट्टीचे दिवस सोडून) कार्यालयीन वेळेमध्ये सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत सर्व सिलबंद निविदा पत्रिका पालघर येथे कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर याचे कार्यालयात स्विकारल्या जातील व शक्य झाल्यास अंतिम तारखेस निविदा धारकासमोर/प्रतिनिधिसमोर निविदा उघडण्यात येतील.

| अ क्र | तपशील | इसान्याची रक्कम | निविदा फॉर्म विक्रीचा कालावधी | निविदा सादर करावयाची अंतीम तारीख व वेळ | निविदा उघडण्याची तारीख व वेळ | निविदा पत्रिकेची किंमत | चिकु कराराचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर, येथील प्रक्षेत्रावर चिकु बागेतील फळे काढण्यास मे २०२२ पर्यंत देणे | रू. १०,०००/- | दिनांक २५/१०/२०२१ ते १५/११/२०२१ | दिनांक १५/११/२०२१ १३.०० वाजेपर्यंत | दिनांक १६/११/२०२१ १५.०० वाजता | रू. ५००/- | माहे १७ नोव्हेंबर २०२१ ते ३१ मे २०२२ |

सविस्तर निविदा सुचना कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर, यांच्या कार्यालयात कामाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध होतील.

(सही)

**प्रभारी अधिकारी**

कृषि संशोधन केंद्र

पालघर, जि. पालघर

जा.क्र. कृसंकेंशि/चिकु निविदा/८८५/२०२१

कृषि संशोधन केंद्र, पालघर, जि. पालघर

दिनांक – 25/10/2021